महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्रकटन

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२१ साठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या नाव, जन्मतारीख, विषय व तत्सम माहितीमधील दुरुस्त्यांबाबत.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२१ कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उदभवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्र.परीक्षा ०६२१/प्र.क्र.४६/एसडी-२ दि.११/०६/२०२१ अन्वये रद्द करण्यात आली आहे. तद्नंतर विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन कार्यपध्दतीबाबतचा तपशील शासन निर्णय क्रमांक परीक्षा ०६२१/प्र.क्र.५६/एसडी२ दि.०२/०७/२०२१ नुसार जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार राज्य मंडळाने मूल्यमापन कार्यपध्दतीसंदर्भात दि.५/०७/२०२१ च्या परिपत्रकाव्दारे तपशीलवार सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

तत्पूर्वी सन २०२१ परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत दि.०३/०४/२०२१ रोजी ऑनलाइन प्रवेशपत्र देण्यात आलेली आहेत. सदर प्रवेशपत्रामध्ये १) विषय/माध्यम २) फोटो ३)विद्यार्थ्याची स्वाक्षरी ४) विद्यार्थ्यांचे नाव ५) जन्मतारीख व ६) इतर तत्सम दुरूस्त्या असल्यास याबाबत संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे संबंधित विभागीय मंडळाकडे दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधित विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक व सर्व माध्यमिक शाळा यांना आपल्या स्तरावर सूचित करावे. सर्व विभागीय मंडळांनी यासंदर्भातल्या दुरूस्त्या विभागीय मंडळातील/निर्धारित गणकयंत्र विभागामार्फत करून राज्य मंडळाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार राज्य मंडळाच्या गणकयंत्र विभागाकडे पाठवाव्यात.

तरी उपरोक्तप्रमाणे दुरुस्त्या करणेबाबत सर्व माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक ,विद्यार्थी, शिक्षक, पालक व इतर संबंधित घटक इत्यादींनी नोंद घ्यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

दिनांक: १८/०७/२०२१

---

क्र./नाविमं/उ.मा. (परीक्षा)/६ye.
नाशिक-४२२००३
दिनांक:- १९/०७/२०२१

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मंडळ कार्यालयाच्या कार्यक्षेत्रील
सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्यांना कळविण्यात येते की, राज्य मंडळाच्या वरील प्रकटनाची नोंद घ्यावी. सदरचे प्रकटन सर्व शिक्षक, विद्यार्थी ,पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,